ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 11 | ISSUE - 7 | MARCH - 2025

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# भारतीय सांस्कृतिक जीवन : यात्रा, सण, उत्सव व लोककला ; एक चिकित्सक अभ्यास

**डॉ. युवराज सुरवसे**
संशोधक मार्गदर्शक (एम.ए., पीएच.डी., सेट) छत्रपती शिवाजी नाईट कॉलेज ऑफ आर्टस् अँड कॉमर्स, सोलापूर जि. सोलापूर
**चंद्रज्योती रामदास भाजीभाकरे**
संशोधक विद्यार्थीनी (एम.ए.) छत्रपती शिवाजी नाईट कॉलेज ऑफ आर्टस् अँड कॉमर्स, सोलापूर जि. सोलापूर



## प्रस्तावना :

कोणत्याही देशाचा आरसा म्हणजे त्या देशाची संस्कृती आणि संस्कार. संस्कारातून व्यक्तिमध्ये रूजवल्या जाणाऱ्या मूल्यांचे मूळ हे त्या देशाच्या संस्कृतीत दडलेले असते. महासत्ता होऊ पाहणाऱ्या भारताला संस्कृतीचा प्रचंड मोठा वारसा लाभलेला आहे. या संस्कृतीमुळे देशातील सांस्कृतिक जीवन देखील समृद्ध झाले आहे. पूर्वीच्या काळी राजेरजवाडेंनी लोककलाकारांना दिलेल्या आश्रयामुळे त्यांच्या कलाप्रेमामूळे लोककला प्रकार जनमाणसात वाढीस लागले.

समाज प्रबोधनाचे मुख्य माध्यम म्हणून विविध लोककला उदयास आल्या. संतांच्या काळामध्ये अभंग, भारूडे, कीर्तन यातून धर्मप्रसार व समाज प्रबोधनाचे कार्य केले जात असे. आर्थिक विकासामुळे सांस्कृतिक जीवनामध्ये प्रगती झाली. त्यामुळे सांस्कृतिक हा शब्द संस्कार, संस्कृती यापुरता मर्यादित न राहता त्यामध्ये साहित्य, कला, संगीत, नृत्य, चालीरीती परंपरा, तत्त्वज्ञान, नाट्य यांसारख्या विविध अंगांचा समावेश होत गेला.

आधुनिक काळामध्ये तर यात तंत्रज्ञान, योजना, तंत्र, नियम यांचा देखील समावेश होत आहे. संस्कृती ही सर्जनशीलतेचे प्रतीक आहे. संस्कृतीमुळे धर्मासह समग्र अंतर्बाह्य जीवनाचे मूल्यमापन करता येते. इतरांच्या दृष्टिकोनातून जग पहायला लावणारी संस्कृती चैतन्यशील समाजाचे द्योतक आहे. सांस्कृतिक जीवनाशिवाय मानवी जीवन समृद्ध होणार नाही. विविध धार्मिक प्रथांमधून जीवन बहरत जात आहे.

## उद्देश :

१. विविधतेचे दर्शन घडविणे.
२. विविध कलागुणांना वाव देणे.
३. लोककला व लोकसाहित्य यांचे जतन व संवर्धन करणे.
४. विविध भारतीय संस्कृतीचा अभ्यास करणे.
५. समाज जीवनातील यात्रा, उत्सव यांचे महत्त्व अधोरेखित करणे.

**सांस्कृतिक जीवन साजरे करण्याचे विविध मार्ग आहेत ते खालीलप्रमाणे :**

१. यात्रा

२. सण

३. उत्सव

४. लोककला

**सांस्कृतिक जीवनाचे महत्त्व :**

१. सांस्कृतिक जीवनामूळे देशातील विविधतेचे दर्शन होते.

२. कलागुणांना वाव मिळतो.

३. सांस्कृतिक जीवनामुळे विविध कलांचे जतन होते.

४. सांस्कृतिक जीवनामुळे समाज प्रबोधनाचे कार्य होते.

५. सांस्कृतिक जीवनामुळे सृजनशीलतेला वाव मिळतो.

६. सांस्कृतिक जीवन हे एक उदरनिर्वाहाचे साधन म्हणून देखील उदयास आले आहे.

७. परंपरा, मूल्ये व संस्कार यांची रूजवणूक सांसस्कृतिक जीवनातून सहज शक्य आहे.

**सांस्कृतिक जीवन समृद्ध करणारी माध्यमे :**

**यात्रा :**

यात्रा आणि जत्रा हा शब्द आपण सहजपणे समान अर्थाने वापरतो; परंतु या दोन शब्दांमध्ये कमालीचा फरक आहे. जत्रा म्हणजे अनेक लोकांनी एकत्र येऊन आनंद साजरा करावयाचा एक प्रकार. जत्रा ही ठरावीक गावांपुरती मर्यादीत असते. आजूबाजूच्या गावातील किंवा पंचक्रोशीतील लोक जत्रेला येतात. महाराष्ट्रामध्ये जवळजवळ प्रत्येक गावांमध्ये जत्रा ही प्रथा आहे. या निमित्ताने गावागावात विविध मनोरंजनाचे कार्यक्रम आयोजित केले जातात. कुस्ती, तमाशा, बैलगाडा शर्यती यांसारखे मनोरंजनाचे कार्यक्रम व क्रीडाप्रकार आयोजित केले जातात. जत्रा हे लोकसंपर्काचे प्रभावी माध्यम आहे. जत्रा ह्या सहसा मौसमी असतात. सौरवर्षातील पवित्र महिने चैत्र, श्रावण, मार्गशीर्ष या महिन्यांमध्ये मुख्यत्वे जत्रा ह्या होतात.

यात्रा म्हणजे एखादी व्यक्ती किंवा गटाने केलेला प्रवास होय. प्रवास सहसा धार्मिक कारणासाठी केला जातो. हा प्रवास पायी किंवा वाहनाने देखील केला जातो. यात्रेचे दोन प्रकार पडतात. तीर्थयात्रा व पर्यटन यात्रा. तीर्थयात्रा या धार्मिक कार्यासाठी देव दर्शनासाठी केल्या जातात. काशी यात्रा, अमरनाथ यात्रा, आषाढी यात्रा, चारधाम यात्रा ही काही उदाहरणे.

बहुतांशी तीर्थयात्रा ह्या दु:खनिवारण, पापनिवारण, मन:शांती यासाठी केल्या जातात. शेकडो मैल पांडुरंगाच्या भेटीसाठी चालत केली जाणारी यात्रा ही दींडी म्हणून ओळखली जाते. ही दिंडी आज जगभर आषाढी यात्रा म्हणून प्रसिद्ध आहे. ओडिसा राज्यातील जगन्नाथ पूरी येथील जगन्नाथ रथ यात्रा हा देखील कुतूहलाचा विषय आहे. साहस आणि धार्मिकतेचा मिलाफ म्हणजे हिमालयातील केदारनाथ, अमरनाथ आणि वैष्णवीदेवी या यात्रा होय.

**तीर्थयात्रेचे अनेक फायदे आहेत.**

१. अनुभव समृद्धता.

२. संस्कृती, धर्म, चालीरीती यांची ओळख.

३. विचारांचे आदानप्रदान.

४. मानसिक समाधान.

५. अर्थव्यवस्थेला चालना.

६. आत्मज्ञानाची प्राप्ती.

तीर्थयात्रा हा असा एक अनुभव आहे. जो व्यक्तीच्या जीवनाला एक नवीन आयाम देतो. तीर्थयात्रा ह्या फक्त धार्मिक आणि आध्यात्मिक दृष्टीने महत्त्वपूर्ण नसून व्यक्तीच्या समग्र विकासास सहाय्यक ठरते. तीर्थयात्रेच्या माध्यमातून मनुष्य जीवनाला एक नवीन दिशा प्राप्त होते. एक नवीन ऊर्जा प्राप्त होते. तीर्थयात्रेतील सत्संग, भजन, प्रवचन, पारायणे इत्यादीतून नवीन ज्ञानप्राप्ती होते. अशात मन सुखद अनुभवाने शांत होते. आत्मीक सुखाची प्राप्ती होते.

यात्रा ही अनेक नवीन गोष्टी शिकण्याचा एक उत्तम मार्ग आहे. जगभरातील लोक विविध ठिकाणी यात्रा करत आहेत. धार्मिक कारणांबरोबरच शिक्षण, व्यापार, वैद्यकीय कारणे व निखळ मनोरंजन यासारख्या विविध कारणांसाठी लोक प्रवास करतात.

**सण :**

सांस्कृतिकदृष्ट्या व भौगोलिकदृष्ट्या वैविध्यपूर्ण असलेल्या आपल्या देशात अनेक सण साजरे केले जातात. वर्षाच्या सुरुवातीपासून ते अगदी अखेरपर्यंत प्रत्येक सणांचे महत्त्व हे त्यावेळी बदलणारे वस्तूमान, हवामानातील बदल, अनेक शास्त्रीय कारणे यांच्याशी निगडीत असतात. प्रत्येक सणाचा निसर्गाशी खूप जवळचा संबंध आहे. हिरवागार निसर्गसंपन्न भारत म्हणजे सणांची रांगोळी, रंगांची उधळण होय. इथल्या मातीलाही इथल्या संस्कृतीचा गंध येतो.

माणसाच्या जीवनात जो शांतपणा व स्वास्थ्य असावे लागते ते आजच्या धकाधकीच्या आणि धावपळीच्या जीवनात हरवून गेला आहे. सर्व प्रकारचे सण साजरे करताना सकारात्मक उर्जा, सकारात्मक दृष्टीकोन, मन:शांती व आनंद मिळतो. भारतीय सण हे चंद्राच्या कलेनुसार म्हणजेच तिथीनुसार साजरे केले जातात.

प्रत्येक मराठी महिन्यामधील पौर्णिमा ह्या विशेष आहेत. बुद्धपौर्णिमा, वटपौर्णिमा, गुरुपौर्णिमा, नारळी पौर्णिमा, कोजागिरी पौर्णिमा, कार्तीक पौर्णिमा, चैत्रपौर्णिमा (हनुमान जयंती), पौष पौर्णिमा (नव्याची पौर्णिमा) इत्यादी सण हे पौर्णिमेला साजरे केले जातात. ऋतुमानानुसार प्रत्येक सणांना केल्या जाणाऱ्या नैवेद्याच्या पदार्थांमागे एक शास्त्रीय कारण आहे. जसे की, हिवाळा ऋतुत येणाऱ्या मकर संक्रांतीला शरीरात उष्णता निर्माण करणाऱ्या गुळ, तीळ, शेंगादाणे, बाजरी यांसारख्या पदार्थांचे सेवन या सणाच्या निमित्ताने केले जाते. गुढीपाडव्याला ऋतुपालटामुळे होणाऱ्या संसर्गापासून वाचण्यासाठी औषधी कडुलींबाचा मोहोर, चिंच, गूळ, हरभऱ्याची डाळ यांचे सेवन केले जाते तर कडकडीत उन्हाळ्यात आल्हाददायक वाटणाऱ्या आम्ररसाचे सेवन साडेतीन मुहूर्तापैकी एक असणाऱ्या अक्षयतृतीयेपासून केले जाते.

संपूर्ण भारतभरामध्ये वेगवेगळ्या राज्यांमध्ये वेगवेगळे सण मोठ्या उत्साहात साजरे केले जातात. जसे तमीळनाडू राज्यात पोंगल, केरळातील ओणम, कर्नाटकातील बेंदूर, पश्चिम बंगालमधील नवरात्र उत्सव, मुस्लीम बांधवांचा रमजान व ख्रिस्त बांधवांचा नाताळ, पंजाबमध्ये बैसाखी हे सण मोठ्या उत्साहात साजरे केले जातात.

विविध प्रादेशिक सणांबरोबरच दिवाळी व गणेशोत्सव यांसारखे सण संपूर्ण भारतामध्ये साजरे होतात. स्वातंत्र्य दिन, प्रजासत्ताक दिन, महात्मा गांधी जयंती, यांसारखे राष्ट्रीय सण संपूर्ण भारतभर देशप्रेमाची व देशभक्तीची जपणूक करतात. भारतीय स्वातंत्र्याचा इतिहास आठवण्याचा व स्वातंत्र्य सैनिकांप्रती आदरभाव व्यक्त करण्यासाठी या दिवसाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. प्रजासत्ताक दिनी देशातील संरक्षण व्यवस्थेची तिन्ही दले शक्तीप्रदर्शनातून जगाला आपल्या परिपूर्णतेचे व ताकतीचे प्रदर्शन घडवून आणतात. विविध राज्याचे संस्कृतिक कार्यक्रम हे दिल्लीतील कर्तव्य पथावर होतात. अशा प्रकारे सणांमधून उदात्त भारतीय संस्कृतीचे दर्शन व जतन होते.

**उत्सव :**

उत्सव हा लोकजीवनाचा एक भाग आहे. शब्दकोषातील अर्थानुसार 'उत्सव म्हणजे आनंद.' आल्हाद उत्साह, आनंदाचा दिवस, समारंभ, सण उत्साहाने व आनंदाने साजरे करणे म्हणजेच उत्सव होय. उत्सवातून लोकसंस्कृतीचा जागर होतो. मानवाच्या सामाजिक जीवनाचा विकास उत्सव, समारंभाच्याद्वारेच होतो. मानवाच्या अंगभूत असणाऱ्या कलात्मक प्रवृत्तीला उत्सव प्रसंगी आविष्काराची संधी मिळते. उत्सव जीवनातील दैन्य, दुःख तात्पुरत्या काळापुरतेतरी विसरायला लावून माणसात नवीन उर्जा निर्माण करतात. कृषीप्रधान भारत देशात निसर्गाशी नाते सांगणारा ग्रामीण समाज उत्सवामध्ये विशेष रस घेतो. निसर्गात होणारे परिवर्तन उत्सवाच्या रूपात साजरे करणे हे भारतीयांची खरी ओळख आहे. उत्सवातील कार्यक्रम हे लोकांना एकत्र आणण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करतात.

माणूस हा उत्सवप्रीय प्राणी आहे. नित्याच्या घडणाऱ्या गोष्टींपेक्षा काहीतरी वेगळे अनुभवयाला मिळावे म्हणून तो धडपडत असतो. कोणताही आंनद अनुभव एकट्याने न लुटता तो सामूहीकपणे लुटावा म्हणून उत्सव साजरा होतो. सर्वांनी अमोद-प्रमोद, निसर्ग आणि ललीतकला यांचा रस घ्यावा, आपले भावजीवन समृद्ध करावे हा उत्सवाच्या मागचा मुख्य हेतू आहे.

**भारतामध्ये साजरे केले जाणारे मुख्य उत्सव :**

**गणेशोत्सव :**

जनमनोरंजन आणि लोकशिक्षण यासाठी लोकांनी एकत्र यावे, त्यांच्यात एकीची भावना निर्माण व्हावी म्हणून लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सव सरु केला. दहा दिवस चालणारा हा उत्सव म्हणजे आनंदाची पर्वणी आहे. विविध गुणदर्शन, लोकशिक्षण कार्यक्रम, व्याख्याने व विविध स्पर्धा यांसारख्या व्यापक कार्यक्रमांनी गणेशोत्सव साजरा केला जातो.

**नवरात्र उत्सव :**


स्त्रीशक्तीचा जागर करणारा नवरात्र उत्सव हा संपूर्ण भारतभर वेगवेगळ्या उपक्रमातून साजरा केला जातो. पश्चिम बंगाल, गुजरात या राज्यामध्ये तर हा उत्सव खूप मोठ्या आनंदात साजरा केला जातो. गरबा, दांडीया, स्त्रीशक्तिचा जागर करणारे विविध कार्यक्रम साजरे केले जातात. शक्तिची आराधना ही व्रतवैकल्ये, उपवास अशा वेगवेगळ्या पद्धतीने केली जातात.

**स्वातंत्र्य उत्सव :**

१५ ऑगस्ट हा भारताचा स्वातंत्र्य दिवस. भारतीय स्वातंत्र्याचा दैदिप्यमान इतिहास पुढच्या पिढीला कळावा, स्वातंत्र्याची कथा प्रत्येकाच्या मनात साठवावी यासाठी १५ ऑगस्ट हा राष्ट्रीय सण संपूर्ण देशात मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. स्वातंत्र्यलढ्यातील सेनानींना मानवंदना करून राष्ट्रीय प्रतिकाचेही पूजन केले जाते.

**लोककला :**

भारत हा सांस्कृतिकदृष्ट्या संपन्न असा देश आहे. देशातील ग्रामीण भागातून आजही विविध समाजगट ही संपन्नता जोपासत आहेत. समाजाच्या विविध गटातून तयार झालेली गीत, नृत्याचे प्रकार, कविता, संकल्पना यांचा समावेश लोककलांमध्ये होतो. या लोककलांमुळे लोकककला रंगभूमी विकसित झाली आहे. कीर्तन, दशावतार, वगनाट्य, तमाशा, बहुरुपी, डोंबाऱ्याचे खेळ, पोवाडा, शाहीरी, जागरण गोंधळ, ओव्या, भारुड, पिंगळा, चित्रकला वासूदेव या विविध माध्यमातून लोककला समृद्ध होत गेली आहे. लोककला ही देशातील सांस्कृतिक जीवनाचा अविभाज्य घटक आहे. लोककलांमधून संस्कृती जतन करण्यास मोलाची मदत होते. लोककलेमध्ये विविध गीतांचा समावेश होतो.




लोकगीते ही दैनंदिन जीवनाशी संबंधित असतात. त्यांची रचना सहजसोपी असते. म्हणून ती म्हणावयास सोपी जातात. दादरा आणि केरवा या तालाच्या पलिकडे त्यांची लय जात नाही. लोकगीते गाताना होणारा शब्दांचा उच्चार हा विशिष्ट ऱ्हस्व व दीर्घ पद्धतीने होणारा असल्यामुळे तो ऐकताना व म्हणताना मनाला विशेष आनंद होतो.

## चित्रकला :

भारतीय चित्रकला ही जगप्रसिद्ध आहे. विविध प्रादेशिक चित्रकलांनी कलाक्षेत्रात भरीव कामगिरी केलेली आहे. भारतीय देवदेवतांना चेहरा देणारा कलाकार म्हणून राजा रविवर्मा यांना ओळखले जाते. भारतीयांचा गौरवशाली इतिहास आजही आपल्याला दृकस्वरूपात पहावयास मिळतो तो चित्रकलेमुळेच. भारतातील विविध चित्रकला प्रकार –

१. मधूबनी
२. पट्टचित्र
३. कलमकारी
४. वारली
५. गोंड
६. पासोडी
७. पहाडचित्र
८. बाटिक
९. बांधणी

## नृत्य :

लोककला जोपासणारा हा एक आनंददायी प्रकार. अनादिकालापासून देवभक्तीपासून ते मनोरंजनापर्यंत ही कला उपयोगात आणली जाते. भारतात आठ शास्त्रीय नृत्यप्रकार आहेत. महाराष्ट्रामध्ये लोकनृत्याचे काही प्रकार अतिशय लोकप्रिय आहेत. लावणी हे महाराष्ट्राचे लोकनृत्य हे पारंपरिक गाणे आणि नृत्य याचे संयोजन आहे. ढोलकीच्या तालावर साजरी केली जाणारी लावणी ही विशिष्ट लयींसाठी प्रसिद्ध आहे. लावणी बरोबरच मोहिनीअट्टम, भरतनाट्यम, कथ्थकली, घूमर, दांडीया, मणीपूरी नृत्य, लेझीम, ओडीसी नृत्य यांसारखे नृत्याचे विविध प्रकार आहेत.

नृत्यप्रकाराची सुरुवात मंदिरातील नृत्यप्रकार म्हणून झाली होती. देवदासी देवतांसमोर नृत्य करीत. यातील काही प्रकार शिव तांडवाला त्यांचे मार्गदर्शक मानतात तर काही कृष्णलीलेभोवती केंद्रीत आहेत. भारतीय मंदिरांच्या दगडी भिंतीवर विविध नृत्य, आसने कोरलेली आहेत. नृत्यप्रकाराची सुरुवात ही भगवान शंकरांनी केली आहे.

**समारोप :**

प्राचीन भारतीय संस्कृतीचे जनत व संवर्धन ही काळाची गरज बनली आहे. संपूर्ण जगामध्ये भारतीय संस्कृतीविषयी कुतूहल व जिज्ञासा निर्माण करुन भारतीय संस्कृतीचा प्रसार व प्रचार करणे हे क्रमप्राप्त ठरते. त्यासाठी देशातील नागरीकांनी आपल्या परंपरा, भारतीय ज्ञान, वैशिष्ट्ये, इतिहास, विविधता यांचा अभ्यास करणे गरजेचे आहे. संस्कृतीचा व संस्कारांचा प्रचंड मोठा वारसा जपण्याचे कार्य सण, उत्सव यांच्या माध्यमातून होते त्यामुळेच आपण शोधनिबंधाचा हा विषय निवडून त्यावर प्रकाश टाकताना अनेक भारतीय संस्कृतीची नव्याने ओळख झालेली आहे. यात्रा, जत्रा व विविध लोककला यातून संस्कृतीचे जतन नक्कीच होणार आहे.

**संदर्भसूची :**

१. कोकणातील लोककला (पुष्पलता तापस - राजापुरे)
२. भारतीय सण आणि उत्सव (स्वाती कर्वे)
३. भारतीय सण आणि उत्सव (मधू जाधव)
४. महाराष्ट्राची सांस्कृतिक लोककला (रामचंद्र देखणे)
५. श्रावण-भाद्रपद (संपादिका - सरोजीनी बाबर)
६. दिवाळी – दसरा (संपादिका - सरोजीनी बाबर)
७. सांस्कृतिक जीवन (संपादिका - सरोजीनी बाबर)